ग्रामिणांच्या सहभागातुन वन व्यवस्थापन.
वनपरिक्षेत्र (तालुका) स्तरीय समित्या गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :एफडीएम-२०१०/प्र.क्र.५६/फ-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :-२७. ९.२०१०

वाचावे :-

१. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एसएलएफ-१०९१/प्र.क.११९/फ-११, दि.१६/३/१९९२
२. शासन निर्णय महसूल व वन विभागक्रमांक- वी एस.एस.-१०९९/प्र.क्र.१६१/फ-२, दि. २०/१/२००१.
३. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक- एम.एस.सी-२०००/प्र.क.१४३/फ-२, दि. २५/४/२००३
४. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एफडीएम-२०१०/प्र.क्र.३८/फ-२, दि.२.७.२०१०.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय वन निती १९८८ तसेच महाराष्ट्र वन धोरण, २००८ अन्वये वनक्षेत्रांचा विकास आणि संरक्षण लोकांचे सक्रिय सहभागातुन अपेक्षित आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने दिनांक १.६.१९९० च्या पत्रान्वये कळविलेल्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन महाराष्ट्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्रमांक-१ वरील शासन निर्णयान्वये ग्रामिण पातळीवर वनसंरक्षक समित्यांचे गठण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ग्रामपातळीवर वनसंरक्षक समित्या गठीत करण्यात आल्यात.

उपरोक्त संदर्भ क्रमांक-३ च्या शासन निर्णयान्वये १६ मार्च १९९२ चे निर्णयात सुधारणा करण्यात येवुन संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे निर्मिती आणि त्यांचे कामकाजाकरिता निश्चित प्रणाली ठरविण्यात आली.

त्यानंतर केंद्र शासनाने वनक्षेत्र आणि वनक्षेत्राचा परिसरात राहणा-या लोकांचे विकासा करीता समन्वित ग्राम वनिकरण समृध्दी योजना राबविण्या करीता सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्यात. त्यास अनुसरुन वनविकासाशी निगडीत रोजगार निर्मितीच्या उद्देशाने, ग्रामीण विकास तथा वनसंवर्धनाची सांगड घालुन एकछत्री (Umbrella) एकात्मिक वनविकासाची योजना म्हणुन समन्वित ग्राम वनिकरण समृध्दि योजनेची अंमलबजावणी राज्यात यशस्वीपणे होण्याचे दृष्टीने प्रत्येक वनविभाग तसेच स्वतंत्र वन उपविभागात वन विकास यंत्रणांची स्थापना उपरोक्त संदर्भ क्रमांक २ वरील शासन निर्णयानुसार करण्यात

आली. सदर वनविकास यंत्रणेचे माध्यमातुन आणि संयुक्त वन व्यवस्थापन समित्या मार्फत पासुन केंद्र शासनाकडून राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात राबविल्या जात आहे.

आजमितीस राज्यात ४७ वन विकास यंत्रणा कार्यरत आहेत. त्यांचे मार्फत राज्यातील ३३ जिल्ह्यातील २४०७ गावात राष्ट्रीय वनिकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मागील सुमारे १० वर्षाचा अनुभव विचारात घेवुन केंद्र शासनाने राष्ट्रीय वनिकरण कार्यक्रमांचे अमलबजावणी साठी २००९ मध्ये सुधारीत मार्गदर्शक तत्वे अंमलात आणली आहेत, याचा मुख्य हेतु प्रकल्प व्यवस्थापन विषयक कार्यप्रणालीचे विकेंद्रीकरण करुन ग्रामस्तरावरील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यां पर्यंत निधीचे हस्तांतरण कालापव्यय न होता योग्य वेळी होणे, संयुक्त वन व्यवस्थापन संस्थांची क्षमता बांधणी करणे आणि वन उपजांचा दर्जा मुल्य वृध्दीद्वारे सुधारुन त्यास बाजारपेठ उपलब्ध करणे व याद्वारे ग्रामस्थांचे जिवनमान उंचावणे हा आहे. सदर सुधारीत मार्गदर्शक सुचनेस अनुसरुन सन २०१०-११ पासुन राज्य पातळीवर "राज्य वन विकास यंत्रणा" संदर्भ क्रमांक-४ वरील शासन निर्णयानुसार स्थापित करण्यात आली असुन सर्व वनविकास यंत्रणा या यंत्रणेचे सदस्य आहेत.

आजमितीस राज्यातील सुमारे १२६०० वनालगत असलेल्या गावात संयुक्त वन व्यवस्थापन समित्या गठीत झाल्या असुन सर्वसाधारणत: प्रत्येक वनपरिक्षेत्रात (तालुका पातळी) सरासरी ३५ ते ४० संयुक्त वन व्यवस्थापन समित्या कार्यरत आहेत. केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या विविध विकास योजनांचा विशेष करुन शासनाच्या महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजनाचा निधी वापरुन वनिकरण आणि जलमृदसंधारणेची कामे या सारख्या ग्रामीण विकासाला गती देणाऱ्या कामांची अमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी ग्रामपातळीवर कार्यरत असलेल्या संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या कामगिरीचे वेळोवेळी प्रभावीपणे सनियंत्रण राखणे आणि विविध समित्या तसेच तालुका स्तरावरील विविध विकास योजना राबविणाऱ्या शासकिय आणि इतर यंत्रणांमध्ये समन्वय राखण्या करीता तालुका स्तरावर समन्वय समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमा अंतर्गत वनपरिक्षेत्र (तालुका) पातळीवर खालीलप्रमाणे समन्वय समिती गठित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**वनपरिक्षेत्र (तालुका) स्तरावरील संयुक्त वन व्यवस्थापन समन्वय समिती**

एका वनपरिक्षेत्रात सर्वसाधारणत: ( ३५ ते ४० ) संयुक्त वनव्यवस्थापन समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. ह्या पातळीवरील सर्व संयुक्त वनव्यवस्थापन समित्याकरीता वनपरिक्षेत्र स्तरावरील समन्वयक समिती राहील. या समितीची संरचना खालील प्रमाणे राहील

१) सहाय्यक वनसंरक्षक (संबंधित वनपरिक्षेत्राचे परिक्षक अधिकारी) — अध्यक्ष

२) वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) — सदस्य सचिव

| | |
|---|---|
| ३) वनपरिक्षेत्रातील सर्व संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे अध्यक्षांपैकी संबंधित वनविकास यंत्रणेच्या अध्यक्षांनी नाम निर्देशित केलेल्या प्रतिनिधी चक्राकार पध्दतीने (दोन वर्षाकरीता) | ५ प्रतिनिधी (किमान २ महिला प्रतिनिधी आवश्यक ) |
| ४) जिल्हा पातळीवर संत तुकाराम वनग्राम योजनेच्या ग्राम बक्षिसप्राप्त समित्यांचा अध्यक्ष संबंधित उपवनसंरक्षक / उपविभागीय अधिकारी यांनी नाम निर्देशित केल्य प्रमाणे (दोन वर्षाकरीता) | १ प्रतिनिधी. |
| ५) वरील बाब क्रमांक (४) ह्यातील संयुक्त वनव्यवस्थापन कार्यप्रणालीतील गावाचे सरपंच. | १ प्रतिनिधी. |
| ६) संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांच्या कार्यक्षेत्रातील आणि कार्यक्रम अंमल बजावणीत सहभागी महिला बचत गटांचा प्रतिनिधी. (संबंधित उपवनसंरक्षक / उपविभागीय अधिकारी यांनी नाम निर्देशित केल्य प्रमाणे चक्राकार पध्दतीने (दोन वर्षाकरीता.) | ३ प्रतिनिधी (एका बचत गटातून फक्त एक प्रतिनिधी) |
| ७) संबंधित तालुक्याच्या गटविकास अधिकारी ह्यांचा प्रतिनिधी. | १ प्रतिनिधी. |

( ह्या शिवाय समितीस आवश्यकते प्रमाणे तहसील पातळीवरील इतर अधिकाऱ्यांना विशेष निमंत्रित सदस्य म्हणून सहभागी करता येईल)

समितीची कर्तव्ये खालीलप्रमाणे असतील.

१. वनपरिक्षेत्रातील सर्व संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे कामकाज विहीत प्रकारे चालण्यासाठी तसेच समित्यांमध्ये आपापसात तसेच तालुका स्तरावरील इतर विकास यंत्रणांमध्ये समन्वय साधणे.
२. मागील बैठकीत झालेल्या निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.
३. संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे बळकटीकरणाकरीता विविध प्रकारचे प्रशिक्षणाचे विषय व कार्यक्रम ठरविणे.
४. नाविन्यपूर्ण कल्पनांचे आदान प्रदान करणे.
५. संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांना त्यांचे प्रशासनातील अडचणी सोडविण्यास मार्गदर्शन करणे.
६. प्रादेशिक वनविभाग किंवा स्वतंत्र उपविभाग पातळीवरील वनविकास यंत्रणेसोबत समन्वय राखणे.
७. संयुक्त वनव्यवस्थापनाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वयं रोजगार निर्मितीकरीता स्वयंसेवी गटांना प्रभावी करणे.

सदर समिती दर ३ महिन्यात कमीत-कमी एकदा ७ दिवसांची पूर्व सूचना देवून बैठक आयोजित करेल. बैठकीचे कार्यवृत्तांत ७ दिवसात तयार करुन संबंधित वनविकास यंत्रणेस सादर करेल. समितीच्या बैठकीकरीता कमीत-कमी ५० टक्के सभासद उपस्थित र हा आवश्यक राहील. तसेच समितीच कामकाजावर संबंधित वनविकास यंत्रणा आणि वनविक स यंत्रणेचे कामकाजावर राज्य वनविकास यंत्रणा नियंत्रण ठेवेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व न ना ।.

(प्रफुल्ल ठाकूर)
कार्यासन अधिकारी
महसूल व वनविभाग

प्रतिलिपी :-

१) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
२) सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
४) महाराष्ट्र शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय वि भ गांचे प्रधान सचिव व सचिव
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र र ज्य, नागपूर
७) व्यवस्थापकीय संचालक, वनविकास महामंडळ म र्या. नागपूर
८) संचालक, सामाजिक वनिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे
९) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) १०) मुख्य वनसंरक्षक (सर्व)
११) सर्व विभागीय आयुक्त १२) वनसंरक्षक (सर्व)
१३) जिल्हाधिकारी (सर्व)
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१५) प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
१६) उपवनसंरक्षक (सर्व)
१७) जिल्हा विकास अधिकारी (सर्व), जिल्हा कृषि अधिकारी / मृद संधारण अधिकारी (सर्व)
१८) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व), जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी (सर्व), जिल्हा उद्योग अधिकारी (सर्व)
१९) जिल्हा सार्वजनिक आरोग्य अधिकारी (सर्व)
२०) सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वनविभाग (वनकक्ष)
२१) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई.